# येशू पुनरुत्थानाच्या रविवारी मरणातून पुन्हा उठला आणि सदोदित जिवंत आहे

मुलांना शिकवण्यासाठी पुढीलपैकी कोणतेही कार्यक्रम **निवडा,**

मुलांनी पुढील चित्र काढावे किंवा रंगवावे.



**शिक्षकांनी किंवा मोठया मुलाने येशू मरणातून उठला हा वृत्तांत वाचून दाखववावा** किंवा सांगावा मार्क 15:1-16:8 यामध्ये येशू कसा मरणपावला, त्याला पुरले आणि तिसऱ्या दिवशी तो पुन्हा उठला याविषयी सांगितले आहे.

वृत्तांत सांगून झाल्यावर, पुढील प्रश्न विचारा प्रत्येक प्रश्नानंतर उत्तर दिले आहे.

येशू मरण पावला आणि पुन्हा उठला तेव्हा त्याने आमच्यासाठी काय केले? (येशूचे रक्त आमची पातके झाकते आणि त्याचे पुनरुत्थान त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वाना जीवन देते)

पिलात येशूला काय संबोद्यतो? (यहूदयांचा राजा, मार्क 15:2)

शिपायांनी येशूला कशा प्रकारे वागणूक दिली? (मार्क 15:17-19)

त्याच्या डोक्यावरील पाटीवर त्यांनी काय लिहिले? (मार्क 15:26)

येशूने मोठयाने काय आरोळी मारली? (मार्क 15:34)

अरिमथाईकार योसेफने काय केले? (मार्क 15:43-46)

कबरेच्या तोंडाशी काय ठेवले होते? (मार्क 15:46)

कबरेकडे गेलेल्या कोणाकोणाला कबर रिकामी दिसली? (मार्क 16:1)

**पुनरुत्थाच्या वृत्तांताच्या भागांचे नाटयीकरण करा.**

ही नाटिका मुलांना उपासने मध्ये सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्यांशी चर्चा करा.

मुलांचा चांगला सराव करुनघ्या. त्यासाठी योग्य वेळ द्या.

तुम्ही काही भाग वगळू शकता किंवा शास्त्रलेखातील वचनांची भर घालता येईल.

मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी.

मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात.

**निवेदक:** वृत्तांत सांगा मुलांकडून त्यांनी काय बोलायचे त्याची तयारी करुन घ्या.

**सैनिक:** चाबूक, काटयांचा मुगुट व अंगरखा ह्या गोष्टी जमवा.

**याजक:**

**येशू**

**पिलात**

**योसेफ:** कापड तयार करा.

**लहान मुलांनी पुढील भूमिका कराव्यात**

**स्त्रिया:** अत्तर ठेवण्यासाठी बाटल्या तयार करा.

**जमाव**

**देवदूत**

पुनरुत्थानाची नाटिका तीन भागांमध्ये सादर करा.

**भाग 1 ( मार्क 15:1-20 )**

**निवेदक:** मार्क 15:1-20 ह्या शास्त्रभागातून पहिला भाग वाचून दाखवा किंवा लक्षात ठेवून सांगा मग म्हणा, ''याजक काय म्हणतात ते ऐका''

**याजक:** ''महाराज, ह्या मनुष्याने आमचे नियम मोडले हा मरणदंडास पात्र आहे''

**पिलात:** ''येशू तू यहूदद्यांचा राजा आहेस का?''

**येशू:** ''मी आहे''

**पिलात:** आश्चर्यचकित झाल्यासारखा दिसतो, मग म्हणा, घ्या मनुष्यामध्ये मला काही दोष दिसत नाही लोकहो, भी याला सोडून देऊ का?''

**जमाव:** रागाने ओरडतो, ''बरब्बाला सोडा! येशूला वधस्तंभावर शिळा!''

**पिलात:** ''सैनिकहो, त्याला घेऊन जा आणि वधस्तंभावर खिळा''

**सैनिक:** येशूला चाबकाचे फटके मारत असल्याचा अभिनय करा त्याला अंगरखा व काटयांचा मुगुट घाला. त्याची थट्टा मस्करी करीत म्हणा, ''हे यहूद्यांच्या राजा, तुझा जयजकार असो!'' ''हा पाहा तुझा मुगुट!'' ''हा तुझा अंगरखा!'' ''हा तुझा वधस्तंभ! उचल तो!''

**भाग 2 ( मार्क 15:22-47 )**

**निवेदक:** दुसरा भाग (मार्क 15:22-47) वाचून दाखवा किंवा सांगा. निवेदक बोलत असताना येशू ओणवा होऊन पाठीवर जड वधस्तंभ उचलून चालल्याचा अभिनय करीत हळूहळू खोलीभर फिरतो. निवेदकाचे बोलणे संपल्यावर सैनिक वधस्तंभ जमिनीवर ठेवल्याचा अभिनय करतात.

**निवेदक:** म्हणा, ''सैनिक काय म्हणतात ते ऐका''

**सैनिक:** येशूला वधस्तंभावर खिळल्याचा अभिनय करा म्हणा, ''आपण याच्या अंगरख्यासाठी चिठ्ठया टाकू या.'' (येशूला खुर्चीवर बसवा, त्याचे हात बाजूला करा, येशूला उचलून वधस्तंभावर खिळल्याचा अभिनय करा.

**जमाव:** ''बघा बघा! येशू राजा आहे असे सांगणारे ते चिन्ह पाहा.'' ''ए! येशू स्वत:चा बचात कर!''

**याजक:** ''येशू तुझे सामर्थ्य दाखव! वधस्तंभावरुन खाली उतर!''

**येशू:** मोठयाने आरोळी तारतो, ''माझ्या देवा, माझ्या देवा, तू माझा त्याग का केलास?''

**स्त्रिया:** ''हे काय झाले येशू मेला!''

**भाग 3 ( मार्क 16:1-8 )**

**निवदेक:** वृत्तांताचा तिसरा भाग सांगा (मार्क 16:1-8)

म्हणा ''योसेफ काय म्हणतो ते ऐका.''

**योसेफ:** ''पिलात महाराज, मला येशूचे शरीर पुरण्यासाठी द्या.'' (स्त्रिया लक्षपूर्वकपाहतात) येशूला वध स्तंभावरुन खाली काढा, त्याला कापडात गुंडाळा आणि कबरेमध्ये (टेबलाखाली) ठेवा. त्यांच्या पुढे एक धोंडा (खुर्ची) ठेवा.

**निवेदक:** ''तिसऱ्या दिवशी महान अद्‌भुत चमत्कार घडला.'' धोंडा बाजूला काढा येशू उठून एका बाजूला चालत जातो.

**स्त्रिया:** अत्तराच्या कुप्या घेउन कबरेकडे जा, डोळ्यातले अमू पूसा. विचारा, ''ती भली मोठी धोंड कोण बाजूला करणार?'' ''ते पाहा! धोंड बाजूला झालेली आहे!'' ''बघा, बघा! तेथे देवदूत आहे!''

**देवदूत:** ''येशू जिवंत आहे! जाऊन त्याच्या शिष्यांना सांगा!''

**निवेदक:** नाटिका केव्हा संपणार ते सांगा आणि मुलांचे आभार माना.

येशू मरण पावला व पुन्हा उठला तेव्हा त्याने आमच्यासाठी काय केले आसा प्रश्न मुलांना प्रौढांना विचारता येईल. उत्तरामध्ये येशूच्या रक्ताने आमची पातके झाकली गेली आणि त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यां सर्वांना त्याच्या पुनरुत्थानाने जीवन दिले या गोष्टींचा समावेश असला पाहिजे.

काही मुलांना वधस्तंभावर खिळलेल्या येशूचे चित्र काढायला सांगा, तर काही मुलांना कबरेच्या बाहेर जिवंत उभा असलेल्या येशूचे चित्र काढायला सांगा ही चित्रे मुलांना उपासनेच्या वेळी मोठया माणसांना दाखवता ये तील आणि येशू आमच्याकरीता कसा मरण पावला आणि आम्हांला जीवन देण्यासाठी तिसऱ्या दिवशी पुन्हा उठला हे स्पष्ट करुन सांगता येईल.

**पाठ करा 1 पेत्र 1:3**

**कविता:** चार मुलांपैकी प्रत्येकाला स्तोत्र 21:1-4 ह्या शास्त्रभागातील एकेक वचन पाठ म्हणायला सांगा. मोठया मुलांना येशूच्या पुनरुत्थाना विषयी कविता लिहिण्यास सांगा.

**प्रार्थना:** ''प्रिय येशू, आज आम्ही तुझे व पुनरुत्थानाचे आठवण करतो. तुझ्या पुनरुत्थानाने आम्हांला जीवन मिळाले. आम्ही तुझी स्तुती करतो!''

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net